<u>नियमित दिवाणी दावा क्र.१४/२०१९ मधील नि.क्र.४२ वरील आदेश</u>

(CNR NO MHRG14-000206-2019)

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांस दाव्यास कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. वादींतर्फे सदर अर्जावर म्हणणे देवून जोरदार हरकत घेतली आहे. त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला आहे की, सदर प्रतिवादींनी जाणीवपूर्वक कैफियत देण्यास विलंब केला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा वाटपाकरीता, ठरावाकरीता व निरंतर मनाई हुकुमाकरीता प्रतिवादींविरुध्द दाखल केला आहे. सदरचा दावा दिवाणी न्यायालय व.स्तर, पनवेल यांचेकडून या न्यायालयात वर्ग करण्यात आला आहे. सदर दाव्याचे कामी प्रतिवादी यांनी पनवेल येथील न्यायालयात कैफियत व म्हणणे दाखल केले होते. परंतु सदर कैफियत व म्हणणे विलंब झाला असल्याने अभिलेखावर घेण्यात आलेली नव्हती. त्यामुळे प्रतिवादी यांना या न्यायालयात त्यांची कैफियत दाखल करणेस तांत्रीकदृष्टया ३ वर्षे १ महिना २३ दिवसांचा विलंब झाला असल्याचे दिसून येते. सदर प्रतिवादी हे त्यांची कैफियत दाखल करुन दाव्यास विरोध करणार असून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी तसेच प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता व सदर दाव्याचा निकाल गुणदोषांवर लावणेकरीता सदर प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेणे योग्य व संयुक्तिक होईल. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्ज मंजूर करणेत येत आहे.

WALI NILESH MALAKAPPA
Digitally signed by WALI NILESH MALAKAPPA
Date: 2022.11.17 11:02:19 +0530

ठिकाण – उरण
दिनांक – ११/११/२०२२

(निलेश म. वाली)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.